# ३. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न: प्रवृत्ती आणि रचना

# NATIONAL INCOME: TRENDS & STRUCTURE


BY

**DR. RAJANI V. SONTAKKE**

**ASSOCIATE PROFESSOR**

**ECONOMICS**


G D P


Job production
Batch production
Flow production
Production?





# राष्ट्रीय उत्पन्न : अर्थ
# NATIONAL INCOME : MEANING

- कोणत्याही देशाच्या अर्थव्संस्थेचे निष्पदन कसे आहे हे जाणून घेणे त्या देशातील लोकांच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतु अर्थव्यवस्थेचे निष्पदन जाणून घेण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करणे आवश्यक असते. म्हणजेच आर्थिक विकासाच्या मापणाच्या दृष्टीने राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना अत्यंत महत्वपूर्ण ठरते. अर्थव्यवस्थेचे स्वरूप आणि त्यामध्ये होणारे बदल मोजण्याचे हे एक चांगले साधन आहे. कोणत्याही राष्ट्रचे उत्पन्न हे अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या वस्तू व सेवांची एका विशिष्ट कालखंडातिल बेरीज असते.
- भारताच्या राष्ट्रीय उत्पन्न समितीने राष्ट्रीय उत्पन्नाची केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे,

**“एखाद्या विशिष्ट कालावधीत निर्माण केल्या जाणाऱ्या एकूण वस्तूंचे आणि सेवांचे द्विमापन होऊ न देता केलेले मोजमाप म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाचा अंदाज होय.”**

# राष्ट्रीय उत्पन्नाची प्रवृत्ती
# TRENDS IN NATIONAL INCOME

- नुकतेच केंद्रीय सांख्यिकीय संघटनेने आधार वर्ष1१९९९-२००० ह्या ठिकाणी २००४-०५ ला आधार वर्ष मानून एक नवीन शृंखला सादर केली आहे.परंतु ह्या शृखलेतून केवळ ५ वर्षांचीच (२००४-०५ ते २००८-९ ) माहिती उपलब्ध झाली आहे. ह्या प्रकरणात१९९९-२००० हे आधार वर्ष मानून तयार केलेल्या शृखलेचा उपयोग करण्यात आला आहे. ह्या शृंखळेनुसार भारतातील राष्ट्रीय उत्पन्न हे (निव्वल राष्ट्रीय उत्पादन साधन व्ययावर आधारित ) १९५०-५१ मध्ये (१९९९-२०००) च्या किमतीवर आधारित ) २०४९२४ कोटी रुपये होते.
- तेव्हापासून योजना काळाच्या दरम्यान ह्यात ४.६% दरवर्षी वाढ झाली आणि२००८-९ मध्ये २९,४१,९७१ कोटी रुपये झाली.
- योजना काळात अर्थव्यवस्थेच्या ह्या निष्पत्तीची तुलना स्वतंत्र्यपूर्वी च्या काळाशी केल्यास समाधानकारक वाटते परंतु जर ह्या निष्पत्तीची तुलना योजनांमध्ये निर्धारित केलेल्या उद्‌दिष्टांसोबत केली गेली तर ही निष्पत्ती समाधानकारक वाटत नाही. मागील 18 वर्षांमध्ये (१९९१-९२ ते २००८-०९ दरम्यान) राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ६.३% प्रतिवर्षी असा होता. परंतु इतर राष्ट्रांच्या तुलनेत ही वाढ फार कमी आहे. मागील दोन दशकातील चीन आणि दक्षिण कोरिया मध्ये राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ८.० % असा होता. विकसित भांडवलशाही देशांमधून जपान मध्ये राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर सर्वात जास्त होता आणि१९६०-७० ह्या दशकांमध्ये प्रतिवर्ष ८% पेक्षाही जास्त दराने होता कारण भारत देश अनेक दशकांपासून गुंतवणुकीसाठी आर्थिक गुलामगिरीचा शिकार झाला होता आणि म्हणूनच आर्थिक वृध्दीच्या वाढीचा दर विकसित देशांच्या वृद्‌धी दराप्रमाणे प्राप्त करणे शक्य नव्हते. परंतु तरीही,भारताच्या राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर विकसित देशांच्या वृद्‌धीदराप्रमाणे प्राप्त करणे शक्य नव्हते. परंतु तरीही भारताच्या राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर इतर अल्पविकसीत देशांच्या तुलनेत जसे दक्षिण कोरिया, थायलंड ,मलेशिया आणि चीन पेक्षा खूप कमी राहिला हा चिंतेचा विषय राहिला आहे.
- दहाव्या पंचवार्षिक योजनेत राष्ट्रीय उत्पन्नात ७.८% दराने वार्षिक वृद्‌धी घडून आली.

## पंचवार्षिक योजनाकाळात राष्ट्रीय  उत्पन्न

तक्ता: पंचवार्षिक योजनाकाळात राष्ट्रीय उत्पन्नात वाढ

| पंचवार्षिक योजना आहे | उद्दीष्ट | उद्दिष्टपूर्ती |
|---|---|---|
| पहिली योजना(१९५१-५६) | २.१ | ४.४ |
| दुसरी योजना(१९५६-६१) | ४.५ | ४.० |
| तिसरी योजना (१९६१-६६) | ५.६ | २.६ |
| चौथी योजना (१९६९-७४) | ५.७ | ३.१ |
| पाचवी योजना(१९७४-७९) | ४.४ | ४.९ |
| सहावी योजना(१९८०-८५) | ५.२ | ५.४ |
| सातवी योजना(१९८५-९०) | ५.० | ५.५ |
| आठवी योजना(१९९२-९७) | ५.६ | ६.७ |
| नववी योजना (१९९७-२००२) | ६.५ | ५.४ |
| दहावी योजना। (२००२-२००७) | ८.० | ७.८ |
| १९५०-५१ ते २००८-९ | --- | ४.६ |
| १९५०-५१ ते १९८०-८१ पर्यंत | ---- | ३.५ |
| १९८०-८१ ते २००८-९ | ---- | ५.७ |
| १९९१-९२ ते २००८-९ | ---- | ६.३ |

# प्रवृत्ती : TRENDS

- ह्या सम्पूर्ण योजनाकाळात भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात दरवर्षी सरासरीने ३.७% ने वाढ झाली,. ही वाढीची गती एकदम चांगली किंवा वाईट नसून बऱ्यापैकी आहे असे म्हणता येते.
- पाचव्या-सहाव्या योजनाकाळात उत्पन्न वाढीचा दर ५.२% असा असला तरी पाचव्या व सहाव्या योजनेबरोबर १९७९-८० हे वर्ष विचारात घेतले तर सम्पूर्ण योजनाकाळात जो ३.७% सरासरी दर आहे त्यापेक्षा १९७९-८० हे वर्ष व पाचवा व सहाव्या योजनाकाल ह्यातील शेकडा दर फारसा जास्त नाही हे दिसून येते.
- गेल्या तीस-पस्तीस वर्षांतील राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीत सातत्य व सरळपण नसून तीत बरेच चढ – उतार आहेत.ह्या सम्पूर्ण योजनाकाळातील जवळजवळ सर्वच दहा वर्षे आशी आहेत , की त्यावेळी ह्या दहा वर्षांत दरडोई उत्पन्नात घट होत गेली. आणखी दहा वर्षांचा काळ असा आहे की,, ज्यावेळी दरडोई उत्पन्नातील वाढीचा दर यापूर्वीच्या वर्षातील दरापेक्षा कमी होता. हया योजनाकाळातील ५ वर्षे अशी आहेत ज्यावेळी राष्ट्रीय उत्पन्नाची निरपेक्ष पातळीदेखील घसरली.

- ज्या घटकांमुळे राष्ट्रीय उत्पन्न वृद्धी दरात चढ- उतार होतात त्या घटकांना नियंत्रित करण्याचे कार्य नियोजनाच्या ३०-३५ वर्षांच्या काळात होऊ शकले नाही.
- शेती उत्पादनाचा अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम राष्ट्रीय उत्पन्नाच्या वृध्दीदरावर निश्चितपणे होतो. कोणत्याही शेतीप्रधान देशात शेतीतील उत्पादनाचा राष्ट्रीय उत्पन्नावर परिणाम होतो. परंतु विशेष आर्थिक नियोजन व त्यात शेतीत करण्यात आलेली गुंतवणूक ह्यांचा भारतीय शेतीच्या अनिश्चीततेवर व अस्थिरतेवर कोणताही परिणाम झाला नाही.
- राष्ट्रीय उत्पन्न वृद्धीचं दर वाढविण्यात भारताला आता यश येत आहे. योजनेच्या सुरुवातीच्या २०-२५ वर्षात राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा सरासरी दर ४.६% झाला. शिवाय हेही दिसून येतो की, वेगाने होणारा आर्थिक विकास हा भारतातील काही थोड्या भागांचीच मक्तेदारी आहे व भारतातील उरलेल्या बरीचशी भागात किंवा राज्यात आर्थिक विकासाचा वेग मध्यम प्रतिचा आहे .

# उदारीकरणाच्या काळात राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर
# GROWTH DURING THE LIBERALISATION PHASE

- १९९१ नंतर च्या कालावधीच्या आर्थिक उदारीकरणाचा कालावधी म्हटले जाते. ह्या काळात आतापर्यंत पाच योजना सम्पन्न झाल्या आहेत.
- आठवी योजना (१९९२-९७) ,नववी योजना(१९९७-२००२), दहावी योजना(२००२-०७) ,अकरावी योजना(२००७-१२) आणि बारावी योजना(२०१२-१७) पूर्ण झाल्या आहेत. ह्या कालावधीत राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर फारसा समाधानकारक राहिला नाही. ह्या कालावधी मध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील विषमता फार जास्त वाढली असल्याचे दिसून येते.
- आठव्या पंचवार्षिक योजनेत राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर वार्षिक ६.७% होता जो समाधानकारक मानला जातो., परंतु फारसा उत्साहवर्धक नाही. इतर कारणाशिवाय उत्पन्न वाढीचा दर वरचा ठेवण्याकरिता विदेशी भांडवलाचा अंतरप्रवाह महत्वाची भूमिका बजावत असतो. विदेशी भांडवलाच्या अंतरप्रवाहवर अवलंबून राहणे जोखमीचे आहे कारण आर्थिक व राजनैतिक अस्थिरता निर्माण झाल्यास असे अंतरप्रवाह लुप्त होत असतात.
- मेक्सिको मध्ये नाटकीय रूपाने निर्माण झालेले १९९४ मधील आर्थिक संकट याचे उत्तम उदाहरण आहे.
- १९९७-९८मध्ये पूर्व आशियाई देशांमध्ये निर्माण झालेले आर्थिक संकट विदेशी भांडवलावर अवलंबून होते,.

- **नवव्या पंचवार्षिक योजनाकाळात (१९९७-२००२) राष्ट्रीय उत्पन्नात वार्षिक सरासरी ५.३% ने वाढ घडून आली. ही निर्धारित उद्दिष्टापेक्षा ६.५% दराने वार्षिक वृध्दीदरापेक्षा कमी होती.**
- ह्या समाधानकारक प्रगतीचे मुख्य कारण म्हणजे प्रमुख क्षेत्रे जसे – कृषी आणि निर्माण उद्योग यांचे असमाधानकारक प्रदर्शन होय.
- ह्या योजनाकालावधीत कृषी क्षेत्रात केवळ २.५% वार्षिक आणि उद्योग क्षेत्रात केवळ३.३% वार्षिक वृद्धी घडून येऊ शकली.
- राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास सर्वात महत्वपूर्ण योजना म्हणून दहाव्या योजनेकडे पाहिले जाते. या योजनेत राष्ट्रीय उत्पन्न वाढीचे उद्दिष्ट वार्षिक ८% ठेवण्यात आले होते. ( जे याआधीच्या योजनेतील उद्दिष्टांपेक्षा फार जास्त होते.) ज्यात वार्षिक ७.८% दराने वास्तविक वृद्धी घडून आली. हा दर उद्दिष्टापेक्षा थोडा कमी असला तरी इतर योजनांपेक्षा थोडा जास्त होता.
- वास्तविकपणे, २००६-०७ ला संपणाऱ्या चार वर्षांत भारताचा घरघुती उत्पादनात ८.७% वार्षिक वाढीच्या दराची नोंद करन्यात आली, ज्यामुळे भारत चीन नंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाचा वेगाने विकास करणारा देश बनला. ह्यात २००२-०३ ते २००६-०७ ह्या पाच वर्षांच्या कालावधीत निर्मणी उद्योगात होणारी ८.८% वार्षिक दर आणि २००१-०२ पासून सुरू झालेल्या ६ वर्षात सेवा क्षेत्रात वार्षिक ९% होणारी वाढ समाविष्ट आहे. . ह्यात सरकारी क्षेत्रामध्ये व्यापक प्रमाणावर उत्साह दिसून येतो आणि असे म्हटले जाते की, आता भारत उत्पन्न वाढीच्या वाटेवर आहे. ह्याच अपेक्षेचा हा परिणाम आहे की, अकराव्या पंचवार्षिक योजनेत (२००७-१२) आर्थिक वृद्धीचं उद्दिष्ट वाढून ९% वार्षिक करण्यात आले आहे. काही टिकाकरांच्या मते दहाव्या योजनेत औद्योगिक आणि सेवा क्षेत्रातीळ वास्तविक आणि अनुमाणित वाढीच्या दरापेक्षा कमी आहे. परंतु काही टिककरांचे असे मत आहे की, दहाव्या योजनेत औद्योगिक व सेवा क्षेत्रातील वास्तविक वृद्धी अनुमानीत वृध्दीदरापेक्षा कमी आहे
- जागतिक मंदीच्या कारणानें आर्थिक वृद्धीचं दर जो २००७-८ मध्ये घटून ६.७% राहिला. असा अंदाज आहे की, २००९-१० मध्ये आर्थिक वृद्धीचा दर ७.२% होता..


THANK YOU!
© Can Stock Photo